नियमित.दि.दा.क्र. १०६/१४
वनिता वि. कैलास वगैरे

## आदेश निशाणी २१ खाली

( दिनांक २९—१०—२०१५)

१. प्रतिवादी क्रं. ४ व ५ यांनी प्रस्तुत अर्ज हा त्यांची कैफियत स्विकारण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. प्रतिवादी क्रं. ४ ही स्त्री असुन त्यांचे वडिल अर्धांग वायु या आजाराने आजारी असल्यामुळे व त्यांना आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे मुदतीत कैफियत दाखल करू शकले नसल्याचे प्रतिवादीचे कथन आहे. याउलट, अर्जातील कारण मोघम असुन प्रतिवादींनी जाणीवपुर्वक कैफियत दाखल करण्यास विलंब केल्यामुळे प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याबाबत वादीने म्हणणे दाखल केले आहे.

३. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा हा खरेदी खत रदद होवुन मिळणेसाठी व सरसनिरस मानाने वाटप करून मिळण्याकरिता दाखल केला असल्याचे दिसुन येते. सदर प्रतिवादी प्रस्तूत दाव्यात त्यांची कैफियत दाखल करून दाव्यास विरोध करत आहेत. त्यामुळे दाव्याचे स्वरूप विचारात घेता सदर प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढता यावे याकरीता प्रतिवादींना त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. करीता प्रस्तुत अर्ज मंजुर करणे योग्य आहे. परंतु प्रतिवादींनी मुदतीमध्ये कैफियत दाखल केली नसल्यामुळे जो वादींना असोयीस्करपणा झाला त्या करीता प्रतिवादींना खर्च लावल्यास योग्य व संयुक्तीक आहे. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

अर्ज नि. २१ रूपये २००/— खर्च लावून मंजूर करण्यात येतो.

दि. २९—१०—२०१५.

( सि.ना.गोडबोले )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
माढा

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

Name of Stenographer :- A. G. Kulkarni ( L.G.)
Court :- Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha
Date :- 29 /10 /2015
Order signed by the
Presiding Officer on :- 29 /10 /2015
Order uploaded on :- 29 /10 /2015

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word, as per the original order/Judgment.

Name of Stenographer :- A. G. Kulkarni ( L.G.)

Court :- Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha

| | | |
|---|---|---|
| Date | :- | 27 /10 /2015 |
| Order signed by the Presiding Officer on | :- | 27 /10 /2015 |
| Order uploaded on | :- | 27 /10 /2015 |